**नि.दि.दा.क्र.२९८/२०१९**
**नि.क्र.७७**

प्रतिवादी क्र.१ ते ६ करीता सा.क्र.२

**वादीकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.ए.एस.माकणे यांच्या वतीने शपथेवर सुरू**

१. जिनेश्वर इंडे हे माझे लांबचे नातेवाईक आहेत. दावा मिळकत गट क्र.७८४ मधील २ हे. ११ आर क्षेत्र हे देवचंद इंडे यांचे वडिलोपार्जित आहे हे म्हणणे खरे आहे. देवचंद इंडे यांच्या पश्चात ते क्षेत्र शांताबाई यांच्या नावे गेले हे म्हणणे खरे आहे. गट क्र.७८४ मधील २ हे. ११ आर क्षेत्रापैकी १ हे. ६ आर क्षेत्र शांताबाई यांनी प्रतिवादी क्र.६ दर्शन यांच्या नावे केले हे म्हणणे खरे आहे. बक्षिसपत्राच्या व्यवहारास काहीही देणे घेणे झालेले नाही. माझा जन्म सन-१९७९ मधील आहे. जयश्री बाहूबली कासार या देवचंद इंडे यांची मुलगी आहेत हे म्हणणे खरे नाही. वाद मिळकती या देवचंद इंडे यांच्या वडिलोपार्जित असल्याचे मला माहित नाही. बक्षिसपत्रातील नमूद मिळकतीच्या चतु:सिमा मी सांगू शकत नाही. बक्षिसपत्रातील मजकूर मला माहित नाही हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी शांताबाई यांच्या सांगण्याप्रमाणे मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. जयश्री बाहूबली कासार यांना दावा मिळकतीत हिस्सा मिळू नये म्हणून मी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे खोटे बक्षिसपत्र केले हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.08.08 16:52:42 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक ०८/०८/२०२५.